महाराष्ट्र पोलीस
पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
e-mail :sp.washim@mahapolice.gov.in Website:www.washimpolice.gov.in

दिनांक :– १६/०९/२०२४

## प्रेस नोट

## " श्री " गणेश विसर्जन पोलीस प्रशासन सुसज्ज

वाशिम जिल्हयात दि.०७.०९.२०२४ रोजी सर्वत्र " श्री " गणेश स्थापणा झालेल्या आहेत. शहरी भागात २५६ व ग्रामीण भागात ५१९ अशा एकुण ७८४ सार्वजनीक गणेश मंडळांनी " श्री " ची स्थापणा केली आहे. दि.१६.०९.२०२४ ते दि. १९.०९.२०२४ या कालावधीमध्ये शहरी व ग्रामीण भागात "श्री" गणेश विसर्जन पार पडणार आहेत.

"श्री" गणेश विसर्जन मिरवणुका व ईद ए मिलाद उत्सव शांततेत पार पाडणे करीता "श्री" गणेशोत्सव व ईद ए मिलाद उत्सव संबंधाने वाशिम पोलीस दलातर्फे प्रभावी प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या आहेत.

| | भारतीय नागरीक न्याय संहीता | | | | | म.पो.का. | | दारुबंदी | एपपीडीए |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कलम | १२६ | १२७ | १२९ | १६३(१) | १६८ | ५६ | ५७ | ९३ बी | ३(१) |
| केसेस | ३७२ | १२ | २० | ३९९ | १६५५ | ०८ | ०३ | ५२ | ०८ |

भारतीय नागरीक न्याय संहीता कलम १६३(१) अन्वये "श्री" गणेश उत्सव संबंधाने ३९९ ईसमांना महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये ११ ईसमांना जिल्हयाबाहेर हद्पार तर ०८ ईसमांना स्थानबदध्द करण्यात आले आहे. अशा मोठया प्रमाणात प्रतिबंधक कारवाया करुन समाजविघातक कृत्य करणारे लोकांवर जरब बसविण्यात आला आहे.

" श्री " गणेश विसर्जन मिरवणुका व ईद ए मिलाद उत्सव शांततेत पार पाडणे करीता मोठया प्रमाणात पोलीस बंदोबस्त सज्ज आहे. ०२ क्युआरटी पथक, ०९ स्ट्रायकींग फोर्स, ०२ आरसिपी पथक, वाशिम पोलीस घटकातील व बाहेरील पोलीस घटकातील असे एकुण ०१ पोलीस अधीक्षक, ०१ अपर पोलीस अधीक्षक, ०३ पोलीस उप अधीक्षक, १४ पोलीस निरीक्षक, ८३ सहा.पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक, ७६२ पोलीस अंमलदार, ५२५ गृहरक्षक दलाचे अंमलदार व ०१ प्लाटुन एसआरपीएफ असा मोठया प्रमाणात बंदोबस्त सज्ज आहे.

मा.पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे व अपर पोलीस अधीक्षक श्री. भारत तांगडे यांनी डि.जे. व लेजर–लाईटशो मुळे होणा–या दुर्घटना पहाता, डि.जे. लेजर–लाईटशो मुक्त " श्री " गणेश उत्सव ही संकल्पना राबवावी असे आवाहन केले आहे. पोलीस अधीक्षक वाशिम हे जिल्हयातील ध्वनिप्रदुषण नियमण समितीचे सक्षम अधिकारी आहेत. त्यानुसार त्यांनी ध्वनीप्रदुषण विनिमय व नियंत्रण अधिनियम २००० चे प्रभावी अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. सर्व संबंधीतांना नोटीस तामील करण्यात आल्या आहेत. कोणीही उल्लंघन केल्यास त्यांचेविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल याबाबत समज देण्यात आली आहे.

" श्री " गणेश विसर्जन मिरवणुका व ईद ए मिलाद उत्सव शांततेत साजरा करण्याचे आवाहन पोलीस विभाग व प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम